# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.२९५/२०२३

सर्व नियमित वेतनश्रेणीत व कायमस्वरुपी कार्यरत असलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना क्रिडा स्पर्धा किंवा इतर स्पर्धामध्ये भाग घ्यावयाचा असल्यास त्याबाबत विद्यापीठ संकेतस्थळावर परिपत्रक क्र. ३१८/२०१९ जावक क्रमांक एएन/४८५०, दिनांक १६/१२/२०१९ प्रसिध्द करण्यात आलेले आहे. परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ०३ नुसार क्रिडा प्रकारानुसार वर्षातुन एकदाच संघाची निवड केली जाईल व निवड केलेल्या दिनांकापासून पुढील एक वर्ष कालावधीकरिता सदर संघ कायम राहिल असे कळविण्यात आलेले आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबधितांना कळविण्यात येते की, क्रिकेट स्पर्धेमध्ये ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सहभागी व्हावयाचे असेल, त्यांनी आपल्या विभागप्रमुखांमार्फत उपकुलसचिव, प्रशासन शिक्षकेतर कक्ष यांचेकडे दिनांक ०७/१२/२०२३ रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत अर्ज सादर करावेत. प्राप्त झालेल्या अर्जातून विद्यापीठ संघाची निवड दिनांक ११/१२/२०२३ रोजी सकाळी ०७.०० वाजता विद्यापीठ क्रिडा मंडळाच्या मैदानात करण्यात येणार आहे व सदर संघ दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत कायम राहिल.

(डॉ.विजय खरे)
प्रभारी कुलसचिव

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जावक क्र. एएन/ 3950
दिनांक : 01 DEC 2023

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व शैक्षणिक विभागप्रमुख
२. सर्व प्रशासकीय शाखाप्रमुख

} सदर परिपत्रक संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे ही विनंती

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

परिपत्रक क्र. ३१८/२०१९

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना क्रीडा स्पर्धा किंवा इतर स्पर्धामध्ये भाग घ्यावयाचा असल्यास त्यांना देण्यात येणारी कर्तव्य रजा, निवास, भोजन, प्रवास इत्यादी खर्च व तद्अनुषंगिक बाबींचे धोरण खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहे :-

१. विद्यापीठातील अधिकारी/कर्मचाऱ्यांस कोणत्याही एका क्रीडा प्रकारात व क्रीडा प्रकारानुसार वर्षातून एकदाच स्पर्धेत सहभाग घेता येईल.

२. एकापेक्षा जास्त वेळेस स्पर्धेत सहभाग घ्यावयाचा असल्यास अशा अपवादात्मक परिस्थितीमध्ये संघास पाठविण्याचे अधिकार मा.कुलगुरू यांना राहतील.

३. क्रीडा प्रकारानुसार वर्षातून एकदाच संघाची निवड केली जाईल व निवड केलेल्या दिनांकापासून पुढील एक वर्ष कालावधीकरीता सदर संघ कायम राहील.

४. अधिकारी/सेवकाने संघामध्ये निवड झाल्यानंतर स्पर्धेकरीता जाण्यापूर्वी आपल्या विभागप्रमुखांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर लेखी परवानगी प्रशासन शिक्षकेतर कक्षामध्ये सादर केल्यानंतरच स्पर्धेकरीता जाता येईल.

५. स्पर्धेच्या अनुषंगाने होणारी रजा विशेषबाब म्हणून कर्तव्य रजा जास्तीत जास्त १५ दिवस मंजूर करण्यात येईल.

६. क्रीडा स्पर्धेच्या कालावधीमधील प्रवास भत्ता व इतर भत्ते शासन नियमानुसार देण्यात येईल.

७. सामन्याच्या दिवशी अल्पोपहाराकरीता प्रत्येकी रू. १००/- अतिरिक्त खर्च करण्यास मुभा देण्यात येत आहे.

८. क्रीडा स्पर्धेकरिता प्रशासकीय आणि वित्तीय मान्यतेबाबतची कार्यवाही प्रशासन शिक्षकेतर कक्षामार्फत करण्यात येईल.

९. स्पर्धेकरिता क्रीडा प्रकारानुसार संघ निवडीची कार्यवाही विद्यापीठ क्रीडा मंडळामार्फत करण्यात येईल.

१०. स्पर्धेकरीता गेल्यानंतर निवासाची / भोजनाची व्यवस्था आयोजकामार्फत केली जात असल्याने निवासाचे बिल अदा करण्यात येणार नाही.

११. क्रीडा प्रकारानुसार खेळाकरिता आवश्यक क्रीडा साहित्य व क्रीडा गणवेश पुरविण्याची संपुर्ण कार्यवाही सर्वसाधारण विभागामार्फत करण्यात येईल.

१२. मा.कुलसचिव यांनी केलेल्या नामनिर्देशनानुसार क्रीडा संघासोबत प्रत्येक वेळी वर्ग-१ किंवा वर्ग-२ मधील अधिकारी यांना पाठविण्यात येईल.

१३. अपवादात्मक परिस्थितीत अडचणी / प्रसंग उद्‌भवल्यास त्या अनुषंगाने क्रीडा संघासोबत असणारा अधिकारी योग्य तो निर्णय घेईल.

१४. क्रीडा संघासोबत असणा-या अधिका-याच्या नावे खर्चाकरिता अग्रिम देण्यात येईल व संबंधित अधिका-याने झालेला सर्व खर्चाचा हिशोब वित्त व लेखा विभागास १५ दिवसाच्या आत सादर करावा.

१५. स्पर्धेत सहभाग घेतल्यानंतर संघातील खेळाडूस स्पर्धेमध्ये खेळतांना अपघात झाल्यास त्याकरिता झालेल्या खर्चाची विद्यापीठ निधीतून प्रतीपुर्ती करण्यात येईल.

१६. कोणत्याही क्रीडा प्रकाराकरिता संघातील खेळाडूंना कार्यालयीन वेळेत खेळाचा सराव करता येणार नाही. खेळाडूंनी सराव कार्यालयीन वेळे अगोदर किंवा कार्यालयीन वेळेच्या नंतर करावा.

१७. विद्यापीठ क्रीडा मंडळाकडून अधिकारी/कर्मचाऱ्यांमधून स्पर्धेकरिता संघ निवडल्यानंतर सदर संघातील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी स्पर्धेच्या अनुषंगाने हमीपत्र भरुन प्रशासन शिक्षकेतर कक्षास सादर करावे. (सोबत हमीपत्राचा नमुना जोडला आहे.)

गणेशखिंड, पुणे — ४११ ००७ )
जावक क्र. एएन/4850 )
दिनांक : 16 DEC 2019 )

(डॉ.प्रफुल्ल पवार)
**कुलसचिव**

**सोबत :-** वरीलप्रमाणे

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

} सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.